**MHAM160000872026**

**<u>वारसा प्रमाणपत्र अर्ज क्र. ३२/२०२६ नि.१ वरील आदेश</u>**

**<u>(आदेश पारीत दिनांक ०२/०५/२०२६)</u>**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परिच्छेद २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केला आहे.

**२.** अर्जदाराचे असे कथन आहे की, मयत **राहुल मोहनराव वानखडे** हे कायमस्वरूपी मौजे लोणी टाकळी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील रहिवासी होते. त्यांचा मृत्यु दि. २७/१०/२०२५ रोजी रस्ते अपघातात झालेला आहे. मयत राहुल मोहनराव वानखडे यांची अर्जदार क्र. १ ही आई असुन अर्जदार क्र. २ ही पत्नी व अर्जदार क्र. ३ ही त्यांची मुलगी आहे. सर्व अर्जदार हे मयत राहुल मोहनराव वानखडे यांचे हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वर्ग-१ चे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना सरकारी तसेच निमसरकारी कामाकरीता व कायदेशीर बाबींच्या पुर्ततेकरीता तसेच खाजगी कार्यालयीन कामाकरीता आवश्यक असल्याने अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**३.** सदर प्रकरणात दिनांक ०७/०२/२०२६ रोजीच्या **''दैनिक बातमीपत्र''** या वर्तमानपत्रामध्ये **नि. क्र. १५** नुसार जाहिरनामा प्रसिध्द करुन अर्जदारांनी त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेनंतर मुदतीत कोणीही अर्जदारांच्या विनंतीस आक्षेप अथवा हरकत नोंदविली नाही.

**४.** अर्जातील कथनांच्या पृष्ठ्यर्थ अर्जदार क्र. २ यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र **नि. क्र. ९** वर दाखल केले आहे. त्यामध्ये तिने तिचे पती मयत राहुल मोहनराव वानखडे यांच्या पश्चात अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे शपथेवर कथन



( छाया शा. मेहरे )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
नांदगाव खंडेश्वर

केले आहे. अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ प्रकरणात खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केले आहेत.

| | |
|---|---|
| अ. | मयत राहुल मोहनराव वानखडे यांचा मूळ मृत्युचा दाखला **नि. क्र. १०** वर आहे. |
| ब. | मयत राहुल मोहनराव वानखडे यांचे पडताळणी केलेले आधार कार्ड **नि. क्र. ११** वर आहे. |
| क. | सर्व अर्जदार यांचे पडताळणी केलेले आधार कार्ड **नि. क्र. १२** ते **१४** वर आहेत. |
| ड. | **दैनिक बातमीपत्र** मध्ये प्रकाशित दि. ०७/०२/२०२६ रोजीच्या वर्तमानपत्राची प्रत **नि. क्र. १५** वर आहे. |
| इ. | अर्जदार यांची पुरावा बंद पुरसीस **नि. क्र. १६** वर आहे. |

अर्जाचे पृष्ठयर्थ प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांना हजर होवून कोणीही आक्षेप न घेतल्यामुळे अर्जदारांचा पुरावा अबाधित राहिला आहे.

**५.** अभिलेखावर दाखल कागदपत्रे व शपथपत्र यावरुन असे निदर्शनास येते की, मयत **राहुल मोहनराव वानखडे** हे कायमस्वरूपी मौजे लोणी टाकळी, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील रहिवासी होते. त्यांचा मृत्यु दि. २७/१०/२०२५ रोजी रस्ते अपघातात झालेला आहे. मयत राहुल मोहनराव वानखडे यांची अर्जदार क्र. १ ही आई असुन अर्जदार क्र. २ ही पत्नी व अर्जदार क्र. ३ ही त्यांची मुलगी आहे. सर्व अर्जदार हे मयत राहुल मोहनराव वानखडे यांचे हिंदु वारसा कायद्याप्रमाणे वर्ग-१ चे कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, अर्जदारांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारसा प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायोचित ठरते. वरील सर्व बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.



( छाया शा. मेहरे )
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
नांदगाव खंडेश्वर

२. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत **राहुल मोहनराव वानखडे** यांचे कायदेशीर वारस आहेत, अशी औपचारिक मान्यता (Formal Recognition), देण्यात येते.

३. सदर्हु अर्जदार यांना नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरलेनंतर औपचारिक मान्यतेचे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. सिव्हील मॅन्युअल परिच्छेद क्र. ३१२ चॅप्टर XIV नुसार सदर प्रमाणपत्रावर नोंद घेण्यात यावी.

५. अर्जदारांचा अर्ज निकाली काढण्यात येतो.

दिनांक :- ०२/०५/२०२६

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2026.05.02 14:47:06 +0530

**(छाया शा. मेहरे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नांदगांव खंडे.

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर कथन करतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्द न शब्द सारखा आहे.

न्यायालयाचे नाव :- छाया शा. मेहरे
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नांदगाव खंडेश्वर

कनिष्ठ लिपीक यांचे नाव : सागर एन. भामोदकर
आदेशाची तारीख : ०२/०५/२०२६
आदेशावर सही केल्याची तारीख : ०२/०५/२०२६
आदेश अपलोड केल्याची तारीख : ०२/०५/२०२६



**( छाया शा. मेहरे )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**नांदगाव खंडेश्वर**